## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ८४८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २९/१२/२०१६

**१) शेतशिवारातुन मोटार पंप फोडुन त्यातुन तांब्याच्या ताराची चोरी . :–**

दिनांक २७/१२/२०१६ रोजी १८.०० ते २८/१२/२०१६ रोजी ०८.०० वा. दर. यातील फिर्यादी महेश राजारामजी गोबाडे वय ३५ वर्ष, रा. तलाव वार्ड साकोली यांची एनसन्स कंपनीची मोटार पंप ३ एचपी शेतशिवारा जवळील नाल्यावर लावली असतांना ती मोटार पंप फोडुन त्यातील तांब्याचा तार कि. ४,०००/–रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने कुणी नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. रेवतकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**२) घरातील दाराचे कुलुप तोडुन सोन्या– चांदीचे दागीने व नगदी पैश्याची चोरी . :–**

दिनांक २३/१२/२०१६ ते २८/१२/२०१६ चे रात्र दर. यातील फिर्यादी हे कुटुंबासह बाहेर गावी गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन फिर्यादीचे राहते घराच्या समोरील दाराचे कुलुप तोडुन आत प्रवेश करुन घरातील लोखंडी कपाटात ठेवलेली १ सोण्याची अंगठी ५ ग्रॅम, १ चांदीचा कमरपट्टा दोन तोडे, १ जोडे चांदीच्या मनगट्या व नगदी १०,०००/–रु. असा एकुण २०,५००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी महीपाल अरवींद खोब्रागडे वय ३७ वर्ष रा. सावरी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास नापोशी. सार्वे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक २६/१२/२०१६ रोजी १९.०० ते २७/१२/२०१६ रोजी ०९.०० वा. दर. यातील फिर्यादी पुरुशोत्तम लक्ष्मनदास नरसींगानी वय २८ वर्ष, राजेंद्र नगर तुमसर यांनी आपली हिरो कंपनीची काळया रंगाची पॅशन प्रो मोटार सायकल क्र. एमएच ३६ एस ८३२५ कि. ३०,०००/–रु. ची बोस नगर तुमसर येथील व्हेरायटी मोबाईल शॉप समोर ठेवली असता चोराने कुणी नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. श्रीवास पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**४) चारचाकी वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे, एकाचा मृत्यु . :–**

दिनांक २७/१२/२०१६ रोजी २१.३० ते २२.०० वा. दर. यातील फिर्यादी वसंता सिताराम लोंदासे वय ४५ वर्ष, रा. पहेला हा मोटार सायकल एमएच ३६ डी ४१८८ वर त्याचा मित्र रुपकिशोर गोविंदा दिघोरे वय ४१ वर्ष, रा. पहेला हे दोघेही मोटार सायकल वर बसुन गावी जात असतांना यातील अज्ञात आरोपी चार चाकी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला मागेहुन धडक दिल्याने मृतक रुपकिशोर दिघोरे हा रस्त्यावर पडुन मरण पावल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३०४(अ) भांदवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. शिंदे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) अवैध दारू अडयांवर धाडी . :–**

दिनांक २८/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा, मोहाडी, आंधळगाव व पवनी येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३५ लिटर हातभट्टी दारु कि. ३,५००/–रू. व १८० मिली लिटर देशी दारु कि. ५०/–रु. असा एकुण किंमती ३,५५०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.